# निशाण क. ४८ वरील आदेश

प्रतिवादी क्र.१ व २ यांनी प्रस्तुतचा अर्ज मुद्दयांमध्ये दुरूस्ती करण्याकरिता दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादी याने प्रस्तुतच्या दाव्यात दावा मिळकत त्याची वडिलोपार्जित मालकीची असल्याचे कथन केले आहे. वादी हा संपूर्ण मिळकतीवर स्वत:ची मालकी सांगत आहे. प्रस्तुत प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये वादीचा मालकीहक्क स्पष्टपणे नाकारला आहे. तसेच प्रतिवादींचे पूर्वाधिकारी दावा मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखताने मालक आहेत असे प्रस्तुत प्रतिवादींचे कथन आहे. अशा प्रकारे प्रस्तुत प्रतिवादींनी वादीचा दावा मिळकतीमधील मालकी हक्क स्पष्टपणे नाकारला आहे. मात्र, वादीच्या मालकीहक्काबाबत वाद मुद्दा निश्चित करण्यात आला नाही. सबब, या कारणास्तव दावा मिळकतीच्या मालकीहक्का संदर्भाने वादीचा दावा मिळकतीत कब्जा आहे का? असा मुद्दा निश्चित करणेबाबत प्रस्तुत प्रतिवादींनी विनंती केली आहे.

२. वादीने सदर अर्जास म्हणणे दाखल करून अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार दि.२३/०६/२०१६ इ. रोजी वादीचा उलटतपास घेण्याकरिता प्रस्तुतचा दावा नेमला होता. याकामी दि. ०२/०४/२०१६ इ. रोजी वाद मुद्दे निश्चित करण्यात आले आहेत. आजपावेतो प्रस्तुत प्रतिवादींनी असा अर्ज दिला नव्हता. प्रस्तुत दावा सुनावणीस लागल्यानंतर प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज प्रकरणात विलंब होणेच्या उद्देशाने दाखल केला आहे. वादीने प्रस्तुत दाव्यामध्ये निरंतर मनाईची दाद मागितली आहे व वैकल्पिकरित्या कब्जा मिळणेची दाद मागितली आहे. प्रतिवादींनी सुचविलेले मुद्दे निश्चित करणे आवश्यक नाही. सदर मुद्दयांचा विषय पूर्वी निश्चित केलेल्या मुद्दयांमध्ये समाविष्ट आहे. या कारणास्तव वादीने प्रस्तुतचा अर्ज फेटाळणेची विनंती केली आहे.

३. वादी, प्रतिवादींतर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

४. वादीने दाव्यामध्ये संपूर्ण दावा मिळकतीची मालकी त्याची असल्याचे कथन केले आहे. याउलट, दावा मिळकतीची मालकी वादीची आहे हे प्रस्तुत प्रतिवादींनी स्पष्टपणे नाकारले आहे. किंबहुना प्रस्तुत प्रतिवादी हेच दावा मिळकतीपैकी १/३ हिश्श्याचे मालक आहेत व उर्वरित २/३ हिश्श्याचे मालक भास्कर सिधये यांच्या दोन बहिणी आहेत असे प्रस्तुत प्रतिवादींनी कथन केले आहे. यावरून संपूर्ण दावा मिळकत वादीच्या एकटयाच्या मालकीची आहे हा या दाव्यामध्ये वाद आहे असे दिसून येते. वादीने जरी प्रामुख्याने निरंतर मनाईची दाद मागितली असली तरी देखील दावा मिळकतीमधील कब्जा प्रतिवादींनी घेतल्याचे दिसून आल्यास दावा मिळकतीचा कब्जा वादीला प्रतिवादींकडून मिळावा, तसेच दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींचा हक्क दिसून आल्यास वादी व प्रतिवादींचे क्षेत्र सरसनिरस मानाने वाटप होवून वादीस पृथक कब्जा मिळावा अशा दादी वादीने मागितल्या आहेत. वादीच्या मालकी हक्काबाबतचा वाद विषय आणि वादीने मागितलेल्या कब्जाबाबतच्या व वाटपाबाबतच्या दादी यावरून दावा मिळकतीमध्ये वादीचा मालकी हक्क आहे का? तसेच वाटप होवून मिळणेस वादी पात्र आहे का ? हे वादमुद्दे निश्चित करणे आवश्यक आहेत असे मला वाटते. मात्र, सदरचे मुद्दे निश्चित करण्यात आले नाहीत असे दिसून येते. परिणामी सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे असे मला वाटते. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे:

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. नि.क्र.४१ ला असलेल्या वादमुद्दयांमध्ये बदल करण्यात येतो.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—
( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

देवगड
दिनांक १५/०१/२०१८